# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या तीनशेव्या जयंतीनिमित्त विशेष व्याख्यानमाला संपन्न.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील बहिःशाल शिक्षण मंडळ व ज्येष्ठ नागरीक सहायता कक्ष आणि शिवरुद्र प्रतिष्ठान ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या संत ज्ञानेश्वर सभागृहात पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या तीनशेव्या जयंतीचे औचित्य साधून विशेष व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली.





बहिःशाल शिक्षण मंडळामार्फत महाविद्यालयांमध्ये येत्या शैक्षणिक वर्षांपासून " पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर व्याख्यानमालेचे " आयोजन नव्याने सुरू केले आहे. यावर्षी अहिल्यादेवींच्या तीनशेव्या जयंतीचे औचित्य साधत अहिल्यादेवींच्या कार्याचा परिचय करून देण्यासाठी मा. विनीता तेलंग व मा. डॉ. केदारनाथ फाळके यांच्या व्याख्यानाने सदर व्याख्यानमालेचा शुभारंभ करण्यात आला. प्र - कुलगुरू प्रा. डॉ. पराग काळकर या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून लाभले.

सदर कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती अधिसभा सदस्य मा.प्रसेनजीत फडणवीस, प्रभारी कुलसचिव डॉ. चारुशीला गायके, अधिष्ठाता प्रा. डॉ. सुप्रिया पाटील यांची होती .

त्याचप्रमाणे या कार्यक्रमास रासेयो चे संचालक प्रा. डॉ. सदानंद भोसले, प्रा. डॉ. वैभव जाधव, सिनेट सदस्य श्री.कृष्णा भंडलकर, श्री.शंतनु लामदाडे आदी मान्यवर उपस्थित होते .



सदर कार्यक्रमाचे नियोजन मागील वर्षी झालेल्या अधिसभेपासून चालू झाले. अधिसभा सदस्य श्री. राहुल पाखरे यांनी अधिसभेत अहिल्यादेवींच्या जयंती निमित्ताने बहिःशाल विभागामार्फत व्याख्यानमाला चालू करण्याचा प्रस्ताव मंजूर करून घेतला. या व्याख्यानमालेच्या बोधचिन्हाचे अनावरण २५ मे २०२५ रोजी मा. कुलगुरू प्रा.डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते कुलगुरू कार्यालयात अधिसभा सदस्य व व्यवस्थापन परिषद सदस्य यांच्या उपस्थितीत झाले. यानंतर आज ३१ मे, रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या ३०० व्या जयंतीच्या दिवशी विशेषतः " महिला व युवतींसाठी " पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर व्याख्यानमालेचा समावेश व शुभारंभ करण्यात आला.



याप्रसंगी श्रीमती विनिता तेलंग यांनी अहिल्यादेवींच्या बहुआयामी कार्यावर व व्यक्तिमत्वावर प्रकाश टाकला. मंदिरांच्या उभारणीबरोबर स्त्रियांचे सबलीकरण, आर्थिक नियोजन, सैन्याचे व्यवस्थापन अशा विविध योगदानरूपी कार्याची ओळख करून दिली. अहिल्यादेवींच्या सासूबाईंनी सांगितलेली तत्वे म्हणजे पदर धर, पदर मोड करू नये, पदरात घेणे व पदर पसरू नये या चतुसूत्रीच्या आधारे होळकरांचे बलाढ्य साम्राज्य उभे केले. छत्रपतींनी स्थापन केलेल्या स्वराज्याचे सुराज्य करण्याचे अतिशय महत्त्वाचे

कार्य अहिल्यादेवींनी केले. तसेच भगवद्गीतेत सांगितलेल्या आदर्श स्त्रीच्या प्रारूपाचे उत्तम उदाहरण हे अहिल्यादेवी कशा होत्या याचे स्अत्यंत ओजस्वी भाषेत वर्णन केले. भारतीय स्त्रीचे प्रेरणास्थान म्हणून अहिल्यादेवींचे चरित्र सर्वांना सांगणे हे कसे महत्त्वाचे आहे यावर ही त्यांनी भर दिला.



डॉ. केदार फाळके यांनी अहिल्यादेवींनी जीर्णोद्धार केलेल्या व नवीन बांधलेल्या, उभारलेल्या मंदिरांची माहिती दिली. महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, आंध्र प्रदेशापर्यंत अहिल्यादेवींनी मंदिराचे निर्माण केले. औरंगजेबाने भारतातील हजारो मंदिरे पाडली होती. त्यानंतर भारतीयांचे मनोबल खच्ची करण्याचे काम झाले. अहिल्यादेवीनी १९ व्या शतकामध्ये आपल्या राज्याचे आर्थिक नियोजन करत मंदिराची पुनर्बांधणी आयोजली. मंदिर स्थापत्यशास्त्राचे उत्तम नमुने अहिल्यादेवींनी भारतभरामध्ये तयार केले. आज सुस्थितीमध्ये असलेल्या मध्ययुगीन बहुतांश मंदिराचा जीर्णोद्धार अहिल्यादेवींच्या करवी झालेला असल्याचे फाळके यांनी दाखवून दिले. केदारनाथ मंदिराचा कळस हिमालयातील गरम पाण्याचे कुंड तर दक्षिणेतील श्रीशैलम मंदिर अशी हजारो मंदिरे अहिल्यादेवी यांच्या मुळे आज उभी आहेत. शेती व इतर व्यवसायांचा विकासही अहिल्यादेवींनी केला. 'छत्रपतींनी सांगितलेल्या, हे राज्य व्हावे ही श्रींची इच्छा आहे' याच वचनाला जागून त्यांनी पुढे राज्य चालविले.

सदर कार्यक्रमाच्या उद्‌घाटन प्रसंगी प्र - कुलगुरू प्रा. डॉ. पराग काळकर यांनी अहिल्यादेवींच्या स्मृतीला उजाळा दिला. अहिल्यादेवींचे जीवन कार्य हे विद्यापीठातील विद्यार्थ्यांना प्रेरणादायी आहे आणि विद्यार्थ्यांनी त्यांच्या चरित्राचा अभ्यास आवर्जून करावा असे ही आवाहन त्यांनी केले.





कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहआयोजक सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे सिनेट सदस्य व शिवरुद्र प्रतिष्ठान - ट्रस्ट चे अध्यक्ष श्री. राहुल पाखरे यांनी केले तर सूत्रसंचालन बहि:शाल शिक्षण मंडळ व जेष्ठ नागरिक कक्षाचे मानद संचालक प्रा. डॉ. हरीश नवले यांनी केले .

